पुणे महानगरपालिका
क्रीडा पुरस्कार
सन २०१९-२०

# जाहिर प्रकटन मुदतवाढ

पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा धोरण २०१३ नुसार सन २०१९-२०२० करिता क्रीडा क्षेत्रामध्ये मार्गदर्शनपर उल्लेखनीय कामगिरी बजावून खेळाडूंना घडवून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेस सहभागी होणेस उद्युक्त केले आहे अशा क्रीडा मार्गदर्शकांचा तसेच क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू व क्रीडा क्षेत्राशी संबंधित अशा व्यक्ती ज्यांनी खेळासाठी आपले सर्वस्व अर्पण करून पुणे शहराच्या नावलौकिकांध्ये भर टाकली आहे. त्या व्यक्तीचा पुणे महानगरपालिका क्रीडा पुरस्कार धोरणानुसार पुणे महानगरपालिका क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, कै. बाबुराव दगडू गायकवाड क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार तसेच कै.हरीश्चंद्र बिराजदार क्रीडा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. त्याकरिता पुणे महानगरपालिका हद्दीतील क्रीडा मार्गदर्शक, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू, क्रीडा क्षेत्राशी संबंधित व्यक्ती यांच्याकडून संबंधित क्रीडा संघटना यांचेमार्फत पुणे महानगरपालिका क्रीडा पुरस्कार धोरणाच्या अटी व नियमाला अधीन राहून पुरस्कार देणेसाठी यापूर्वी दि. ०५/११/२०१९ ते दि. २०/११/२०१९ या कालावधीत अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहीर प्रकटनाद्वारे खालील नमूद केलेल्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी सदर नियम व अटींना अधीन राहून पात्र व इच्छुक व्यक्तींनी कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह आपले अर्ज वैयक्तिकरित्या अथवा संस्थेमार्फत / संघटनेमार्फत विहित नमुन्यात महापालिका सहाय्यक आयुक्त (क्रीडा), पुणे महानगरपालिका, क्रीडा विभाग, पं नेहरू स्टेडियम, स्वारगेट यांच्याकडे कार्यालयीन वेळेत सादर करावेत अर्जाचा नमुना व योजनेबाबत अटी-शर्ती व नियम, निवड प्रक्रिया इ. ची सविस्तर माहिती महापालिका सहाय्यक आयुक्त (क्रीडा), पुणे महानगरपालिका, क्रीडा विभाग, पं नेहरू स्टेडियम, स्वारगेट यांचे कार्यालयात व पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.punecorporation.org) उपलब्ध आहे.

**मुदतवाढी अंती छापील अर्ज मिळण्याची व स्वीकारण्याची मुदत दि. २१/११/२०१९ ते दि. ३०/११/२०१९ (कालावधीत सुट्ट्या सोडून कार्यालयीन वेळेत) अखेर.**
**टीप - अंतिम तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

(सुभाष पुरी)
महा.सहा.आयुक्त (क्रीडा)
पुणे महानगरपालिका

(संतोष भोर)
उप आयुक्त (क्रीडा)
पुणे महानगरपालिका